मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | बुधवार, दि. 9 जुलै 2025 | पान- 1

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# भूमिपुत्रांसह पिंपरी-चिंचवडकरांवर अन्याय होणार नाही!

## मंत्री उदय सामंत यांची विधिमंडळ सभागृहात ग्वाही; आमदार महेश लांडगे यांची लक्षवेधी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहराचा प्रारुप विकास आराखडा (DP) अंतिम करताना कोणत्याही भूमिपुत्रावर अन्याय होणार नाही. गोरगरिबांची घरे बाधित होणार नाहीत. देवस्थानच्या जमिनींवर पडलेल्या आरक्षणांची तपासणी करुन रद्द केली जातील, असे आश्वासन कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी आज सभागृहात दिले.




> एमआरटीपी अधिनियम 1966 अन्वये कलम 22 अन्वये सुधारित आराखड्यामध्ये आरक्षणे प्रस्तावित केली जातात. डीपीची कार्यवाही पूर्ण केल्यानंतर तक्रारी आणि सूचनांचा विचार केला जातो. त्यानंतर प्रारुप आराखडा शासनाकडे मंजुरीसाठी जातो. आराखड्यामध्ये सुधारणा करण्याचे अधिकार शासनाला आहेत. पूर्वीपासून असलेल्या देवळांवर आरक्षणे पडली असतील, तर ती तापासून घेणार आहोत. शासन कोणावरही अन्याय होवू देणार नाही. हरकती आणि सूचनांचा विचार करुन पिंपरी-चिंचवडचा डीपी निश्चित केला जाईल. शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही. घरमालकांवर अन्याय होणार नाही, अशी शासनाची भूमिका आहे आणि त्यानुसार योग्य तो निर्णय घेतला जाईल.
>
> **- उदय सामंत, कॅबिनेट मंत्री.**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि नगर रचना विभागाने शहराचा प्रारुप विकास आराखडा दि. 15 मे 2025 रोजी प्रसिद्ध केला आहे. त्यावर हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत. दि. 14 जुलैपर्यंत हरकती-सूचना मांडता येणार आहेत. या आराखड्यावरुन शहरात गेल्या दोन महिन्यांपासून चर्चा रंगली आहे. पिंपरी-चिंचवडकरांच्या आक्षेपांसह पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने शहरातील भाजपाचे आमदार महेश लांडगे आणि आमदार शंकर जगताप यांनी लक्षवेधी सूचना मांडली.

आमदार शंकर जगताप म्हणाले की, डीपी तयार करताना चुकीच्या पद्धतीने केला आहे. बांधकाम परवाने घेतलेल्या जमिनींवर आरक्षण टाकले आहे. पुनावळे येथील कचरा डेपोचे आरक्षण रद्द केले आणि त्या ठिकाणी कमर्शिअल कॉम्प्लेक्सचे आरक्षण टाकले आहे. HCMTR मधील साडेतीन किलोमीटरवर लिनिअर गार्डन विकसित केले आहे. पण, प्रारुप विकास आराखड्यामध्ये त्याचा विचार केलेला नाही. आहे तसे आरक्षण ठेवले आहे. थेरगाव येथेसुद्धा हजारो नागरिक बेघर होणार आहेत. अधिकाऱ्यांनी चुकीच्या पद्धतीने मंत्रीमहोदय यांना माहिती दिली. त्यामुळे मंत्रीमहोदय यांनी गोलगोल फिरवणारे उत्तर दिले. सभागृहाला अधिकारी चुकीची माहिती देत आहेत. बांधकाम परवागनी घेतलेले आरक्षणे रद्द करावीत.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, सध्या प्रारुप आराखडा तयार झाला आहे. त्यामध्ये सुधारणा करण्यात येतील. पण, जुन्या डीपीतील 850 आरक्षणे नव्याने प्रस्तावित केली आहेत. जागेवर जावून आरक्षणे निश्चित करावीत. मोशी-आळंदी भागातील कत्तलखाना मुख्यमंत्र्यांनी रद्द केला. आमच्या देवस्थानच्या जमिनींवर आरक्षण पडले आहे. ती आरक्षणे रद्द केली पाहिजेत. शहरातील गोरगरिबांनी अर्धा गुंठा, एक गुंठा घेवून बांधलेली घरे बाधित होता कामा नये. भूमिपुत्र भूमिहीन झाला नाही पाहिजे. यासह कोणावरही अन्याय होवू नये, अशी स्पष्ट भूमिका मांडली. तसेच, SACCC चे आरक्षण कमी करावे. 25 एकरावर असलेले चऱ्होलीतील गार्डनचे आरक्षण कमी करावे आणि ग्रामस्थांसह स्थानिक नागरिकांचे श्रद्धास्थान असलेल्या देवस्थानच्या जमिनींवरील प्रस्तावित आरक्षणे रद्द करावीत. भूमिपुत्रांच्या हिताचा विचार केला पाहिजे. शेतकरी भूमिहीन होता कामा नये. ब्लू लाईन आणि रेड झोनमधील आरक्षणे विकसित करण्यासाठी शेतकऱ्यांना चांगला परतावा मिळावा. यासाठी 'युडीसीपीआर'च्या नियमावलीमध्ये सुधारणा केली पाहिजे. प्रत्येक पिंपरी-चिंचवडकरांनी दाखल केलेल्या हरकती-सूचनांवर नि:पक्षपणे कार्यवाही केली पाहिजे. विकास आराखडा अंतिम करावा, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली.

# नगररचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड यांची बदली

## छत्रपती संभाजीनगर येथील वाहतूक व परिवहनच्या नगर रचना विभागाच्या उपसंचालकपदी नियुक्ती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नगर रचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड यांची बदली झाली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील वाहतूक व परिवहनच्या नगर रचना विभागाच्या उपसंचालकपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राज्याच्या नगर विकास विभागाचे सहसचिव सुबराव शिंदे यांनी सोमवारी (दि.०७) त्यांच्या बदलीचे आदेश काढले आहेत.




महापालिकेच्या नगर रचना विभागाचे उपसंचालक प्रसाद गायकवाड यांची नियुक्ती दोन वर्षापूर्वी झाली होती. गायकवाड यांच्या कालखंडात महापालिकेचा विकास आराखडा महापालिकेस सादर झाला आहे. त्यांच्याविरोधात महापालिका भवनासमोर आंदोलने झाली होती.

नगरविकास विभागातील पाच उपसंचालकांच्या बदल्या झाल्या. त्यात गायकवाड यांच्या नावाचा समावेश आहे. गायकवाड यांची छत्रपती संभाजीनगर येथील वाहतूक व परिवहन विभागातील नगर रचना विभागातील उपसंचालकपदी बदली झाली आहे. त्यांच्या जागेवर महाराष्ट्र राज्याच्या नागरी संशोधन घटक विभागातील संचालक किशोर विष्णू गोखले यांची नियुक्ती झाली आहे.

# आषाढी वारीत 9 लाख वारकऱ्यांची आरोग्य सेवा!

## परतीच्या वारीमध्येही 10 जुलैपर्यंत विभागाकडून वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यात येणार

**पुणे | प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त देहू-आळंदी ते पंढरपूर व इतर जिल्ह्यांतून आलेल्या ९ लाख वारकऱ्यांना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या उपक्रमांतर्गत विनामूल्य आरोग्य तपासणी आणि औषधोपचाराची आरोग्य सेवा पुरविण्यात आली. पंढरपूरवरून वारी मूळ स्थानी पोहोचेपर्यंत परतीच्या प्रवासातही ही आरोग्य सेवा सुरू राहणार आहे.



संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला निघालेल्या संतांच्या पालख्या आणि दिंड्यांमध्ये सहभागी झालेल्या लाखो वारकऱ्यांना रस्त्यात काही त्रास जाणवला की लगेच उपचार मिळावेत, यासाठी आरोग्य विभागाने 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' या उपक्रमाच्या माध्यमातून वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविली. या उपक्रमाच्या माध्यमातून पालखी मार्गावर आरोग्य विभागातर्फे प्रतिबंधात्मक, उपचारात्मक, आरोग्य संदर्भ सेवा देण्यात आली. वारकऱ्यांना पालखी मार्गावर आणि मुक्कामाच्या ठिकाणी मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आली होती.

आरोग्य विभागाने आषाढी वारीच्या काळात विशेष मोहिमेच्या माध्यमातून ९ लाख २३ हजार ५०९ वारकऱ्यांना आतापर्यंत आरोग्य सेवा पुरविली असून परतीच्या वारीमध्येही १० जुलैपर्यंत विभागाकडून वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यात येणार आहे. पालखी मार्गावर १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेमार्फत आतापर्यंत एकूण १ हजार ११४ वारकऱ्यांना अत्यावश्यक आरोग्य सेवा पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे या वारकऱ्यांना जीवनदान मिळाले आहे. पालखी मार्गावर वारीमध्ये डॉक्टर, परिचारिका, आरोग्य सहायक, आशा, आरोग्य सेवक, शिपाई, सफाईगार अशा सर्व कर्मचाऱ्यांनी सेवा दिली. त्यासाठी विभागाचे ४ हजार ३७६ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ कार्यरत होते.

पालखी मार्गावर वारकऱ्यांच्या सेवेसाठी प्रत्येक पाच किलोमीटर अंतरावर 'आपला दवाखाना' तात्पुरता उभारण्यात आला होता. तातडीच्या आरोग्य सेवेसाठी फिरत्या दुचाकी वाहनासह आरोग्यदूत तैनात ठेवण्यात आले होते. आषाढी वारीमध्ये पालखी मार्गावर मोठी गर्दी असल्याने प्रत्येक ठिकाणी रुग्णवाहिका फिरू शकत नाही, त्यामुळे फिरते दुचाकी आरोग्यदूत प्रथमोपचार पेटीसह सज्ज ठेवण्यात आले होते. त्यांच्या माध्यमातून वारकऱ्यांना तातडीची आरोग्य सेवा पुरविण्यात आली. याशिवाय १०२ व १०८ या क्रमांकाच्या रुग्णवाहिकाही पालखी मार्गावर सेवा देण्यासाठी कार्यरत होत्या. पालखीमध्ये दिंडी प्रमुखांना आरोग्य कीट देण्यात आली होती. याबरोबरच महिलांसाठी प्रत्येक ठिकाणी हिरकणी कक्षाची सुविधा देण्यात आली. तसेच, ५ चित्ररथांच्या माध्यमातून आरोग्य शिक्षण व जनजागृती करण्यासाठी विभागामार्फत नावीन्यपूर्ण व कल्पक पद्धतीने विविध उपक्रम राबविण्यात आले.

### 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' मोहीम

- एकूण कर्मचारी – ४ हजार ३७६
- प्रत्येक ५ किलोमीटरवर 'आपला दवाखाना' – २०३
- वारी दरम्यान १०२ व १०८ रुग्णवाहिका – ३३१
- दिंडी प्रमुखांसाठी औषधी कीट – ३५००
- महिला वारकऱ्यांसाठी रुग्णालयामध्ये कार्यरत स्त्रीरोग तज्ज्ञ – १५
- पालखी मुक्कामाच्या ठिकाणी हिरकणी कक्ष – ३७
- पालखी मार्गावर आरोग्य दूत – २९०
- पालखी सोबत माहिती, शिक्षण व संदेशवहन चित्ररथ – ५
- पालखी मुक्कामाच्या ठिकाणी ५ रुग्णशय्या क्षमता असलेले अतिदक्षता कक्ष – ४६

# पहिल्या सव्वा दोन महिन्यांतच महापालिकेला 1400 कोटींचे उत्पन्न

## महापालिकेचा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत म्हणून मिळकत कर विभागाकडे पाहिले जाते

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या मिळकतकर विभागाला पहिल्या सव्वादोन महिन्यातच १४०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळविण्यात यश आले आहे. एकरकमी मिळकतकर भरल्यास महापालिकेने पाच ते दहा टक्के सवलत जाहीर केली होती. याचा फायदा घेत आतापर्यंत ७ लाख ७५ हजार १४० मिळकतधारकांनी १ हजार ४११ कोटी रुपयांचा मिळकतकर महापालिकेच्या तिजोरीत जमा केला.



महापालिकेचा उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत म्हणून मिळकत कर विभागाकडे पाहिले जाते. चालू वर्षाच्या २०२५ – २६ च्या अंदाजपत्रकात मिळकतकर विभागाला ३२५० कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी पहिल्या सव्वादोन महिन्यांमध्येच १४११ कोटी रुपयांचा महसूल जमा करण्यास मिळकतकर विभागाला यश आले. मिळकतकरात ४० टक्के सवलत मिळावी, यासाठी महापालिकेने नागरिकांकडून 'पीटी-३' अर्ज भरुन घेण्यास सुरुवात केली होती. या अर्जावर निर्णय न झाल्याने अनेक अर्ज प्रलंबित होते. त्यामुळे एक महिना उशीरा मिळकतकराची बिलांचे वाटप यंदाच्या वर्षी करण्यात आले.

सवलतीच्या दरात मिळकतकर भरण्याची मुदत ३० जूनपर्यंत होती. अखेरच्या दोन दिवसांमध्ये ऑनलाईन यंत्रणा कोलमडल्याने नागरिकांना मिळकतकराचे बिल भरताना अडचणी येत होत्या. याबाबतच्या वाढत्या तक्रारी लक्षात घेऊन मिळकतकर विभागाने ७ जुलैपर्यंत सवलतीच्या दरात नागरिकांना मिळकतकर भरता येईल, असे जाहीर केले होते. याचा फायदा घेत सात दिवसात २०० कोटी रुपयांचा मिळकतकर महापालिकेकडे जमा करण्यात आला आहे. रात्री बारा वाजेपर्यंत नागरिकांना ऑनलाईनच्या माध्यमातून मिळकत कराचा भरणा करणे शक्य असल्याने उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता कर आकारणी प्रमुख अविनाश सपकाळ यांनी व्यक्त केली.

गेल्या वर्षी (२०२४ मध्ये) ७ जुलैपर्यंत ७ लाख ७८ हजार ५१६ नागरिकांनी १ हजार ४१५ कोटी ६५ लाख रुपयांचा मिळकत कर भरला होता. मिळकत करातील चाळीस टक्के सवलत, समाविष्ट गावांतील कर घेण्यास असलेली स्थगिती यानंतरही मिळकत कर विभागाने मागील वर्षी इतके उत्पन्न मिळविले आहे. मिळकतकराची थकबाकी वसुलीसाठी पथके नेमण्यात येणार असून अंदाजपत्रकात दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न राहणार असल्याचे सपकाळ यांनी सांगितले.

> मिळकत कर विभागातील कर्मचाऱ्यांनी केलेले प्रयत्न आणि नागरिकांना सवलतीच्या दरात मिळकतकर भरता यावा, यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या सुविधांमुळे पहिल्या सव्वादोन महिन्यात १४०० कोटी रुपयांचे उद्दिष्ट गाठले आहे.
> – अविनाश सपकाळ, उपायुक्त, मिळकतकर विभाग.

# भविष्यवेधी आयटी पार्कचे वर्तमान 'अंधकारमय'!

## वाहतूक कोंडी, 'वॉटर पार्क'नंतर आता बत्ती गुल; बुधवारपर्यंत विजेची प्रतीक्षा

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी आयटी पार्कमधील पायाभूत सुविधांना लागलेले ग्रहण सुटता सुटेना. बराच काळ पाचवीला पुजलेल्या वाहतूक कोंडीने आधीच त्रस्त आयटीयननी यंदाच्या पावसाळ्याच्या तोंडावर जलकोंडीचा अनुभव घेतला. दीड लाख कर्मचारी आणि एक लाख कोटींची निर्यात करणाऱ्या या 'लाख'मोलाच्या परिसरातील समस्यांचा तिसरा अंक आहे विजेच्या लपंडावाचा. पाव शतकापूर्वी भविष्याचा वेध घेऊन उभ्या राहिलेल्या या आयटीनगरीचे वर्तमान मात्र 'अंधकारमय' आहे.



आयटी पार्कमधील वाहतूक कोंडीची समस्या वर्षानुवर्षे कायम आहे. त्यातच यंदा पावसाच्या पहिल्याच काही जोरदार सरींनी आयटी पार्कचे वॉटर पार्क करून टाकले. आता त्याचे 'अंधार' पार्क झाले आहे. 'महापारेषण'च्या इन्फोसिस-पेगॅसस या वीजवाहिनीचा पुरवठा हिंजवडीनजीक रविवारपासून खंडित झाला. त्याचा फटका पिंपरी आणि मुळशी विभागातील ५२ हजार निवासी व औद्योगिक ग्राहकांना बसला. यात आयटी पार्कचाही समावेश आहे. हा पुरवठा सोमवारी पहाटे निवासी भागात सुरळीत करण्यात आला. मात्र, औद्योगिक भागात प्रत्येकी पाच तास चक्राकार पद्धतीने वीजपुरवठा करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. टीसीएस, डीएलएफ, आयबीएम, टेक महिंद्रा, कॉग्निझंट, विप्रो यांसारख्या मोठ्या कंपन्यांचा या भागात समावेश आहे.

आयटी पार्कमधील वीजपुरवठा खंडित झाल्याने रस्त्यांवरील सिग्नलही बंद झाले. यामुळे आयटी पार्क परिसरात मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली. विप्रो सर्कल ते क्वाड्रन या दरम्यान वीजवाहिनीचे काम पुढील दोन दिवस सुरू राहणार आहे. यामुळे या भागातही आगामी काळात वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर फोरम फॉर आयटी एम्प्लॉइज, महाराष्ट्र या संघटनेने कर्मचाऱ्यांना 'वर्क फ्रॉम होम' देण्याची मागणी केली आहे.

फोरमचे अध्यक्ष पवनजित माने म्हणाले, 'आयटी पार्कमधील टप्पा दोन व तीनमध्ये सुमारे दोन लाख कर्मचारी काम करतात. त्या भागात वीजपुरवठा खंडित आहे. त्यामुळे आयटी कंपन्यांनी कर्मचाऱ्यांसाठी घरून कामाची घोषणा करावी. यामुळे कर्मचाऱ्यांचा कार्यालयीन प्रवासाचा वेळ वाचेल.'

> वीज पुरवठा खंडित झाल्याने आयटी पार्कमधील टप्पा दोनमधील सिग्नल यंत्रणा बंद पडली. त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. वाहतूक पोलिसांनी १० जुलैपर्यंत रस्त्यांवर २४ तास कर्मचारी तैनात केले आहेत. याचबरोबर महापारेषणच्या कामाला गती मिळावी, यासाठीही मदत केली जात आहे. आयटी पार्कमधील टप्पा दोनऐवजी माणमार्गे जाणाऱ्या पर्यायी रस्त्याचा वापर वाहनचालकांनी करावा.
>
> **– शंकर सालकर, मुख्य कार्यपालन अधिकारी, हिंजवडी इंडस्ट्रीज असोसिएशन.**

> आयटी पार्क परिसरातील गृहनिर्माण संस्थांचा वीजपुरवठा रविवारपासून खंडित आहे. यामुळे पाण्याचे पंपही बंद आहेत. अनेक गृहनिर्माण संस्थांमध्ये जनित्र नसल्याने त्यांना मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यास कोणतीही पर्यायी यंत्रणा सध्या आपल्याकडे नाही.
>
> **– रवींद्र सिन्हा, समन्वयक, हिंजवडी रेसिडंट्स वेलफेअर असोसिएशन.**

> बिघाड कशामुळे झाला, हे अद्याप स्पष्ट झाले नाही. मात्र, दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. बुधवारी (९ जुलै) दुपारपर्यंत दुरुस्ती पूर्ण करून वीजपुरवठा सुरळीत करण्यात येईल.
>
> **– विठ्ठल भुजबळ, अधीक्षक अभियंता, महापारेषण.**

# वस्ती संसाधन केंद्रामार्फत महापालिकेच्या योजनांचा लाभ

## महापालिकेच्या समाज विकास विभागांतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात

**पुणे | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी समाज विकास विभाग आणि सीफार संस्थेच्या संयुक्त विद्यमाने वस्ती संसाधन केंद्राची निर्मिती करण्यात आली. निगडीतील 'फ' क्षेत्रीय कार्यालयात हे केंद्र स्थापन करण्यात आले आहे. या केंद्रामार्फत गरजूंपर्यंत योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. समाज विकास विभागाच्या उपायुक्त ममता शिंदे, सहायक आयुक्त अतुल पाटील, निवेदिता घार्गे, प्रशासन अधिकारी दशरथ कांबळे, ज्ञानेश्वर ढवळे, सहायक समाज विकास अधिकारी संतोषी चोरगे या वेळी उपस्थित होत्या.

महापालिकेच्या समाज विकास विभागांतर्गत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे, तसेच केंद्र व राज्य शासनाच्या सामाजिक सुरक्षा, आरोग्य व नागरी सुविधाविषयक योजनांचा लाभ समाजातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या दुर्बल घटकांपर्यंत पोहोचविणे हा वस्ती संसाधन केंद्राचा मुख्य उद्देश आहे.



या माध्यमातून प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत विविध वस्ती पातळ्यांवर जनजागृती करण्यात येणार आहे. नागरिकांमध्ये योजनांविषयी जागरूकता निर्माण केली जाणार आहे. विविध योजनांची माहिती गरजू लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वस्ती संसाधन केंद्र उपयुक्त ठरेल. या माध्यमातून वंचित घटकांना योजनांचा लाभ मिळवून देण्याचा व त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. त्याद्वारे समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी उपलब्ध योजना सहाय्यभूत ठरतील, असे उपायुक्त शिंदे यांनी सांगितले.

> शासकीय योजना आणि लाभार्थी यांच्यामध्ये असलेली दरी भरून काढण्यासाठी, गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी वस्ती संसाधन केंद्राने काम करावे. समाजातील गरजू घटकांना माहिती, योजनांचा लाभ देऊन त्यांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रशिक्षित करणे आवश्यक आहे.
>
> **– ममता शिंदे, उपायुक्त, समाज विकास विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# बिंदूमाधव ठाकरे चौकात उड्डाणपूल, ग्रेड सेपरेटर

## महापालिकेचा निर्णय; संगमवाडीवरून येरवड्याकडे जाताना होणाऱ्या कोंडीवर दिलासा



**पुणे | प्रतिनिधी**

संगमवाडीवरून येरवडा, लोहगाव विमानतळ तसेच विश्रांतवाडीकडे जाताना होणारी वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेने बिंदूमाधव ठाकरे चौकात उड्डाणपूल तसेच ग्रेड सेपरेटर उभारण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील अडीच वर्षांत ही दोन्ही कामे पूर्ण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न असून, यासाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याने या कामांसाठी खर्चाचे दायित्व ७२ (ब) अंतर्गत महापालिकेने घेतले आहे. स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता दिल्याने यातील अडचणी दूर झाल्या आहेत.

शहराच्या पूर्व भागातून जुन्या मुंबई पुणे महामार्गाकडे जाण्यासाठी तसेच शहराच्या मध्यवर्ती भागातून विमानतळ आणि अहिल्यानगर रस्त्याकडे जाण्यासाठी प्रामुख्याने हा रस्ता वापरण्यात येतो. विश्रांतवाडीकडे जाणारे वाहनचालकदेखील बिंदूमाधव ठाकरे चौकाचा वापर करतात. त्यामुळे संपूर्ण दिवसभर या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते.

या दोन्ही कामांसाठी सर्वसाधारण ११५ कोटी ७३ लाख रुपयांचा खर्च अपेक्षित धरला आहे. महापालिकेच्या २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात या कामासाठी केवळ ८ कोटींची तरतूद उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही तरतूद कमी असल्याने महापालिकेकडून या प्रकल्पाचे दायित्व स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे या पुलाचे तसेच ग्रेड सेपरेटरचे काम करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### असे आहेत प्रकल्प

- बंडगार्डन ते खडकीच्या दिशेने चार पदरी १५.६० मीटर रुंदीचा उड्डाणपूल असणार आहे. त्याची लांबी ६२० मीटर राहणार आहे. खडकीच्या दिशेने तो १३० मीटर, तर बंडगार्डनच्या दिशेने १५८ मीटर असेल. रॅम्पसह एकूण लांबी ९०८ मीटर असेल.
- चौकात उभारण्यात येणारा ग्रेड सेपरेटर संगमवाडी ते विमानतळ आणि संगमवाडी ते बंडगार्डनकडे जाणारा असणार आहे. संगमवाडी ते विमानतळ मार्गाचे अंतर २१० मीटर असणार असून, त्यातील ६० मीटर भाग पूर्णपणे बंदिस्त असणार आहे. बंडगार्डनकडे जाणारा मार्ग २८९ मीटर रूंद असून, त्याचा बंदिस्त भाग ८० मीटर असणार आहे. हे दोन्ही भुयारी मार्ग ७ मीटर रुंदीचे असणार आहेत.

"संगमवाडी येथून येरवड्याकडे जाणाऱ्या बिंदूमाधव ठाकरे चौकातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी महापालिका तेथे उड्डाणपूल आणि ग्रेड सेपरेटर उभारणार आहे. पुढील अडीच वर्षांत हे काम पूर्ण करायचे असल्याने ७२ ब अंतर्गत दायित्व स्वीकारण्याचा प्रस्ताव स्थायी समितीने मान्य केला आहे.

**- दिनकर गोजारे, मुख्य अभियंता, प्रकल्प विभाग.**

---

# 'चासकमान'मधून 2200 क्युसेकने विसर्ग

## धरणाचे तीन दरवाजे उचलले; सांडव्यातून 1800 तर अतिवाहिनीद्वारे 400 क्युसेकने विसर्ग सोडला



**पुणे | प्रतिनिधी**

चासकमान धरणक्षेत्र तसेच डोंगरमाथ्यावर कधी संततधार तर कधी तुरळक पावसामुळे चासकमान धरण आत्ताच 80.89 टक्के म्हणजेच एकूण 7.088 टीएमसी भरले आहे. तर उपयुक्त 6.12 टीएमसी पाणलोटक्षेत्रात पावसाची अजूनही दमदार बॅटिंग सुरूच आहे. त्यामुळे खबरदारीचा उपाय व संभाव्य पावसाची शक्यता गृहीत धरून सोमवारी (दि. 7) सायंकाळी 6 वाजेपर्यंत चासकमान धरणातून एकूण 2200 क्युसेकने भीमा नदीत विसर्ग करण्यात आला.

खेड तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात विशेषतः भीमाशंकर अभयारण्य परिसरात यंदा प्रथमच मे महिन्यापासून दमदार पावसाने सुरुवात केली. त्यामुळे 8.54 टीएमसी क्षमता असलेले चासकमान धरण 80 टक्के भरले आहे. त्यातच सध्या परिसरात जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

त्यामुळे धरण्याचे तीनही दरवाजे प्रत्येकी 20 सेंटिमीटरने उचलून सांडव्याद्वारे 1800 क्युसेक वेगाने विसर्ग सोडण्यात आला. दरम्यान, पाणलोट पावसाचा जोर कायम राहिल्याने खबरदारीचा उपाय म्हणून सोमवारी सकाळी 11 वाजता अतिवाहिनीद्वारे नियंत्रित पद्धतीने 400 क्युसेकने विसर्ग करण्यात आला होता. त्यामुळे सायंकाळी 6 पर्यंत चासकमान धरणातून एकूण 2200 क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला.

चासकमान धरणाच्या पाणलोटक्षेत्रात अजूनही जोरदार पाऊस सुरू आहे. या भागात गेल्या 24 तासांत 23 मिलिमीटर तर एकूण 398 मिलिमीटर इतकी पावसाची नोंद करण्यात आली आहे. पाणलोट क्षेत्रांतील ओढे-नाले दोन महिन्यांपासून दुथडी भरून वाहत आहेत. भीमा व आरळा नदीद्वारे धरणात सरासरी 4 हजार क्युसेक वेगाने पाण्याची आवक होत आहे.

धरणाच्या साखळी परिसरात संततधार सुरूच आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्याचा अंदाज घेऊन धरणाच्या सांडव्यावरून नदीपात्रात विसर्ग सोडण्यात आला आहे. तसेच धरणाचा पाणीसाठा नियंत्रित राहण्यासाठी विसर्गात वाढही होऊ शकते. यामुळे भीमा नदीकाठच्या गावातील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने इशारा देण्यात आला आहे.

मागील वर्षी याच तारखेला धरणात 11.86 टक्के इतका पाणीसाठा शिल्लक होता. त्या तुलनेत यंदा धरणात 70 टक्के जादा पाणीसाठा झाला आहे. धरण लवकरच पूर्णक्षमतेने भरणार असल्याने खेडसह शिरूर तालुक्याचा पाणी प्रश्न मिटला असून, शेतकरी बांधवांनी समाधान व्यक्त केले आहे.

सध्या चासकमान धरणाची पाणीपातळी 647.15 दशलक्ष घनमीटर आहे, तर एकूण साठा 200.70 दशलक्ष घनमीटर आहे, तर उपयुक्त साठा 173.51 दशलक्ष घनमीटर आहे. मागील वर्षी याच तारखेला धरणाची पाणीपातळी 633 दशलक्ष घनमीटर होती, तर एकूण साठा 52.65 दशलक्ष घनमीटर होता. उपयुक्त साठा 25.46 दशलक्ष घनमीटर होता.